मंगळवार दि.११ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१४६ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# मी गुंडाला गुंड आणि बंडाला बंड: ज्यावेळेस लोकांना माझी गरज नसेल तेव्हा मी घरच्या गादीवर बसेल

## राज्याच्या पर्यावरण मंत्री व भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा बीडमधून घणाघात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड (वृत्तसंस्था)

राज्याच्या पर्यावरण मंत्री व भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील भगवान गडाला भेट दिली. यावेळी बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, जोपर्यंत लोकांना मी हवी आहे, तोपर्यंत मी काम करत राहील. ज्यावेळेस लोक म्हणतील की आता आम्हाला तुमची गरज नाही त्यावेळेस मी घरच्या गादीवर बसेल. तसेच पुढे बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या की मी गुंडाला गुंड आणि बंडाला बंड आहे. यावेळी बोलताना पंकजा मुंडे यांनी अनेक विषयांवर भाष्य केले आहे.

पंकजा मुंडे म्हणाल्या, जोपर्यंत लोकांना मी हवी आहे, तोपर्यंत मी काम करत राहील. ज्यावेळेस लोक म्हणतील की आता आम्हाला तुमची गरज नाही त्यावेळेस मी घरच्या गादीवर बसेल. राजकारणात आणि धर्मकारणात एकमेकांशी नाते असलेच पाहिजे. राजकारणात काम करणाऱ्या माणसाने धर्मकारणात हस्तक्षेप करू नये. आपल्याला छत्रपती शिवाजी महाराजांपासून माहीत आहे की दर वेळी राजसत्ता आणि धर्मसत्ता ही हातात हात घालून चालत असते. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे उदाहरण बघा, सगळे जग बघत आहे.पंकजा मुंडे म्हणाल्या, भगवान बाबा यांच्याविषयी माझ्या मनात काय आहे हे मी शब्दांत कधीच सांगू शकणार नाही. भगवान बाबांच्या दर्शनासाठी मला कुठेही जावे लागत नाही. मी डोळे जरी झाकले तरी मला भगवान बाबांचे साक्षात दर्शन होते. त्यांच्या पवित्र स्मृती आहेत. आम्ही त्यांना पहिले नाही. पण त्यांच्या कहाण्या आज आपण ऐकतो. स्वतःला सत्व तत्व इतके पाळले, स्वतःचे सत्व सिद्ध कार्यासाठी त्यांनी एवढा त्याग केला. त्यांच्या मनात कधी सुद्धा स्वार्थ नव्हता. तसेच आमच्या मीराआई साहेब आहेत.पंकजा मुंडे पुढे म्हणाल्या, लोक मला विचारतात तुम्ही जिथे जातात तिथे तुमचेच लोक फुले घेऊन स्वागतासाठी तयार असतात का? काहींना असेही वाटत असते. पण मी म्हणते मलाच माहीत नसते माझ्या स्वागतासाठी कोण एवढी तयारी करतं. मी तर नेहमी म्हणत असते की जेसीबीने फुले नका उधळू. आता मी रागावले म्हणून फटाके फोडणे बंद केले. पर्यावरण मंत्री समोर फटाके उडवून पर्यावरणाची वाट लावता का?, असा मिश्किल सवालही त्यांनी केला.कोयत्यांना धार देण्यासाठी मी कायम उभी राहील, असेही पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या. पुढे त्या म्हणाल्या चुकीचा अर्थ घेऊ नका. मी कोणत्या गुंडाला घाबरत नाही. मी गुंडाला गुंड आणि बंडाला बंड आहे. मी कशामुळे नवीन पक्ष स्थापन करेल. दिल्लीमध्ये नरेंद्रजी मोदी यांची सत्ता आहे. राज्यात देवेंद्रजी मुख्यमंत्री आहेत. मी स्वतः मंत्री आहे असं असताना मी नवीन पक्ष का काढेल? असे पंकजा मुंडे म्हणाल्या.पुढे बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, मला मंत्री झाले काय नाही झाले काय, काही फरक पडत नाही. एवढे प्रेम तुम्ही करता असेही पंकजा मुंडे म्हणाल्या. पण मंत्रिपदामुळे अधिकार येतात असेही त्या म्हणाल्या. १८२५ दिवस आहेत माझ्याकडे सत्तेचे. वरचे २२५ दिवस असेच जातात. माझ्या १६०० दिवसात राज्यातील प्रत्येक भागात माझ्या विभागाकडून न्याय देण्याचे काम करेल, असे आश्वासन देखील पंकजा मुंडे यांनी यावेळी बोलताना दिले आहे.



# वैचारिक अधिष्ठान असलेली भाजपा एकमेव पार्टी–राहुल केंद्रे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे






वैचारिक अधिष्ठान असलेली पार्टी म्हणजे भारतीय जनता पार्टी होय, या वैचारिक पर्वात सर्वांनी सामील व्हावे असे आवाहन लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व उदगीर विधानसभा संघप्रमुख राहुल केंद्रे यांनी केले.रावणकोळा येथे आयोजित संघटन पर्व सदस्य नोंदणी अभियानात राहुल केंद्रे बोलत होते.

राष्ट्र प्रथम नंतर पक्ष शेवटी स्वतः असे वैचारिक अधिष्ठान असणारी पार्टी म्हणजे भारतीय जनता पार्टी आहे , या वैचारिक भूमीकेमुळेआज देशात भारतीय जनता पार्टीला मोठा जनाधार मिळाला आहे. राष्ट्राच्या उन्नतीसाठी विकासाची दूरदृष्टी कुठल्याच दुसऱ्या पक्षात नाही, देश विकसित होत आहे या सर्व बाबी पाहता आज भारतीय जनता पार्टीचे सदस्यत्व आपण स्वीकारलं पाहिजे असे आव्हानही विधानसभा प्रमुख राहुल केंद्रे यांनी केले. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली व राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या नेतृत्वाखाली होणारी प्रगती जनसामान्यांच्या हिताचा विचार करणारी आहे, त्यामुळे या विकास पर्वत आपण सर्वांनी सहभागी होऊ असे आवाहन केंद्रे यांनी बोलताना केले. या वेळी तालुकाअध्यक्ष सत्यवान पांडे,बालाजीराव गवारे ,सोमेश्वर सोप्पा,बालाजी केंद्रे,बालाजी मालुसरे,मंगेश हुंडेकर गौस पटेल संतोष केसगिरे आनंद साबणे बाबूराव गुट्टे रत्नाकर केंद्रे उपस्थित होते,

# बोराळा तलावाची चिंता: शेतकऱ्यांच्या जमिनी,निकृष्ट बांधकाम आणि धोक्यात गाव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण





हिंगोली जिल्ह्यातील बोराळा गावातील शेतकऱ्यांनी जलसंपदा विभागाच्या नवीन साठवण तलावासाठी जमिनी दिल्या, पण त्यांची चिंता काही केल्या कमी होत नाहीये. तत्कालीन इंजिनिअर इंचेकर यांनी मोठ्या रकमेचे आमिष दाखवून जमिनी घेतल्या, पण शेतकऱ्यांना मोबदल्यासाठी प्रशासनाकडे चकरा माराव्या लागल्या. त्यात भर म्हणजे, गावकऱ्यांच्या जमिनी पाण्याखाली येणार असल्याने त्यांनी तलावासाठी परवानगी दिली, पण आता त्याच तलावातील पाळू अतिशय निकृष्ट दर्जाची होत असल्यामुळे ती फुटल्यास अख्खा गाव पाण्याखाली जाईल, अशी भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

या तलावाचा सांडवा निकृष्ट दर्जाचा बांधण्यात आला असून त्याला भेगा पडल्या आहेत, सिमेंट आणि रेती हाताने निघत आहे. शिकाऊ इंजिनियर उमेदवार काम पाहत असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. यापूर्वीही याच भागात दोन तलाव बांधण्यात आले होते, तेही निकृष्ट बांधकामामुळे अयशस्वी ठरले आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. आता या तलावाची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी शेतकरी संकटात सापडले आहेत.

या तलावाचे काम छउछ कांट्रक्शन कंपनी लातूर यांना देण्यात आले आहे. वाळूचे आणि सांडव्याचे काम व्यवस्थित न झाल्यास काम बंद पाडू, असा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे. जलसंपदा विभाग पूर, दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि शेतकऱ्यांसाठी सिंचनाची सोय उपलब्ध करण्यासाठी कार्यरत असतो, पण बोराळा तलावाच्या बाबतीत त्यांची भूमिका संशयास्पद वाटत आहे.

या गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांची अडचण कोण जाणून घेणार, हा प्रश्न गावकऱ्यांच्या मनात आहे. निकृष्ट बांधकाम आणि संभाव्य धोक्यामुळे बोराळा गाव चिंतेत आहे.

# प्रशासन, नागरिकांचा हलगर्जीपणा गंभीर जखमी अपघातग्रस्तांच्या मुळावर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मालेगाव । संदीप कदम



काल दाभड जवळ तीन अपघात झाले कोणताही पोलीस कर्मचारी मदतीला धावला नाही. तर भोकर फाटा येथील ब्रिजखाली रुग्णवाहिकेच्या बाजूला अनेक वाहने लावून वाहन चालक निघून गेले असता रुग्णवाहिका अपघात ठिकाणी जाण्यासाठी काढता आली नाही दोन गंभीर जखमी तडफडत होते ते स्वतः खाजगी वाहनाने उपचारासाठी गेले. भोकर फाटा येथे ब्रिज खाली अवैध पार्किंग होत आहे. याकडे प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. तर तीन अपघात झाले असता कर्मचारी मदतीला आले नाही मग हे कर्मचारी कुठे राहतात.

# चौधरी पेट्रोल पंपावर चालकांकडून ८० हजार रुपये लूटमार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

देगलूर । जयपाल दावनगीरकर

देगलूर तालुक्यातील मरखेल पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या हाणेगाव येथील चौधरी पेट्रोल पंपावर एका ट्रेलर वाहन चालकांनी रात्री थोडासा विसावा घ्यावा म्हणून ट्रेलर वाहन थांबवून झोपेत असताना वाहन चालकास बेदम लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जवळील ८० हजार रुपये लूटले असल्याची तक्रार मरखेल पोलीस स्टेशनमध्ये दाखल केल्यानंतर आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मरखेल पोलीस सुत्रांकडून प्राप्त माहितीनुसार माधव पंढरी मुसळे रा. सोनूळा ता. जळकोट जि. लातूर हा व्यक्ती आपली ट्रेलर वाहन चालकांनी पेट्रोल पंपाच्या आवारात बाजूला थांबवून थोडीशी रात्रीचे झोप किंवा विसावा घ्यावा म्हणून थांबवला असता त्यावेळी त्या पंपावर काम करत असलेल्या विनोद नारायण राठोड, सौरभ नामदेव राठोड हे दोघे चौधरी पेट्रोल पंपाच्या बाजूला असलेल्या हाणेगाव गट ग्रामपंचायत अंतर्गातील रा.चव्हाणवाडी च्या या दोघांनी मिळून वाहन इथे का लावला तुला इथे लावायला कोण सांगीतले पार्किंग चे पैसे दे असे म्हणून लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जवळील रोख रक्कम ४६ हजार ७५० रुपये व ३३ हजार किमतीचा रेडमी कंपनीचा मोबाईल असे एकूण ७९ हजार ७५० हिसकावून दोघे फरार असल्याचे समजते अशी घटना पेट्रोल पंपावर होत असेल आश्चर्याची बाब आहे. पेट्रोल पंप हे आत्मविश्वासनिय ठिकाण असून रात्री, मध्यरात्री वाहने थांबलेल्या वाहनांवर व ग्राहकांवर झेड सुरक्षा सारखी नियंत्रण ठेवली जाते ग्राहक हा देवता समजल्या जाते पण चौधरी पेट्रोल पंप मालकाचे नियंत्रण नसल्यामुळे ग्राहकांवर वाहनधारकांवर दादागिरी व गुंडागिरी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून वाहन चालकांकडून ८० हजार रुपयांची लूट केली या घटनेमुळे हाणेगाव परिसरातील वाहनधारकांत भितीचे वातावरण पसरले आहे.सदरील घटनेची तक्रार माधव मुसळे यांनी मरखेल पोलीस स्टेशनमध्ये दिल्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक रवि हुंडेकर यांनी करीत आहेत.

# राज्यातील दोन लाख शेतकऱ्यांची खाती ‘आधार’विना: सरकारी लाभांपासून शेतकरी वंचित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मालेगाव । संदीप कदम

राज्यातील दोन लाख शेतकऱ्यांचे बँकेतील खाते क्रमांक आधार प्रणाली अजूनही संलग्न झालेली नाही. त्यामुळे सरकारी लाभांपासून या शेतकऱ्यांना वंचित राहावे लागत आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.महसूल विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले, की आधार क्रमांकाशी अद्यापही बँकेचे खाते न जोडले गेलेले अंदाजे दोन लाख शेतकरी मागास व दुर्गम भागांतील आहेत. त्यांना मुळात हा गोंधळ लक्षात आलेला नाही. बँक खात्याची ई–केवायसी करायची किंवा आधार सीडिंग करायचे म्हणजे नेमके काय करायचे, त्यासाठी कोण मदत करते याची माहिती या शेतकऱ्यांना नाही. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांची बँक खाती १०० टक्के आधार संलग्न झालेली नाहीत. परिणामी, या शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित राहावे लागत आहे.कृषी विभागातील सूत्रांच्या म्हणण्यानुसार, आतापर्यंत राज्यातील ९५ लाख शेतकऱ्यांची बँक खाती आधार संलग्न करण्यात यश मिळालेले आहे. मात्र संलग्नता होऊ न शकलेले शेतकरीदेखील असून ही संख्या पावणेदोन लाखांच्या आसपास असू शकते. या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून त्यांना बँकेत पाठविणे तसेच सार्वजनिक सुविधा केंद्राची मदत घेत आधार संलग्नतेची प्रक्रिया पार पाडण्यासाठी मार्गदर्शन करण्याची कामे चालू आहेत.




या समस्येवर मात करण्यासाठी सर्व विभागांचे प्रयत्न सुरू असल्याचे कृषी आयुक्तालयातील अधिकाऱ्यांनी सांगितले. पीएम किसान योजनेत संबंधित शेतकऱ्याच्या भूमी अभिलेख नोंदीदेखील अद्ययावत असणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. सध्या ९६.२० लाख शेतकऱ्यांच्या भूमी अभिलेख नोंदी अद्ययावत आहेत. परंतु ७९ हजार शेतकऱ्यांच्या नोंदी परिपूर्ण करण्याचे आव्हान कायम आहे.याशिवाय १.८२ लाख शेतकऱ्यांची ई–केवायसी झालेली नाही. भूमी अभिलेख, ई–केवायसी व आधार संलग्नता पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांची संख्या आता वाढून ९२.८० लाख झालेली आहे. त्यामुळे सदर शेतकरी आता ‘पीएम किसान’ व ‘नमो’ अशा दोन्ही योजनांचा लाभ घेण्यास पात्र ठरले आहेत.आधार संलग्नता नसल्याने ‘पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी (पीएम किसान) योजना’ व ‘नमो शेतकरी महासन्मान योजना’ या दोन्ही योजनांची रक्कम बँक खात्यात जमा करता येत नाही, असे एका जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्याने (एसएओ) सांगितले. सर्व विभाग एकत्र आल्याशिवाय शेतकऱ्यांची अडचण दूर होणार नाही, असे हा अधिकारी म्हणाला.

# जाताना...



लोकनेता न्यूज नेटवर्क

प्रिय, विद्यार्थी मित्र मैत्रिणींनो परीक्षा' सुरु होणार तुमची, खूप खूप शुभेच्छा प्रथम तुम्हा सर्वांना. बारावीचे वर्ष, बारावीची परीक्षा सगळं वातावरण वेगळ असत. परीक्षा' ही काही वेळापुरती, काही प्रश्नापुरती असली तरी त्यामागे वर्षभर केलेली मेहनत, अभ्यास असतो.

**परीक्षेला जाताना..**

परीक्षा कोणतीही परीक्षा आपल्या आयुष्यातील एक महत्वाचा भाग असते. त्यातल्या त्यात १२ वीची परीक्षा सर्वांनाच महत्वाची असते. पालक व विदयार्थी यासाठी तयारी करत असतात. १. नियोजन परीक्षेचे नियोजन अभ्यासाचे सातत्य, नियोजन पूर्वक केलेला अभ्यास, प्रत्येकाची समजून घेण्याची विषयानुसार आवड, ग्रहणशक्ती, वातावरण इ. यात येतात.टाईम टेबल.. वेळापत्रक आल्यापासूनच नियोजन करायला हवे. हॉल तिकीट जपून ठेवणे परीक्षा केंद्र व घर,हॉस्टेल,रूम यातील अंतर यानुसार परीक्षा केंद्रावर वेळेआधी पोहचण्याचे नियोजन करणे . त्यासाठी योग्य वाहनाचे नियोजन करने किंवा कशाप्रकारे जायचे ते ठरवणे परीक्षेला घरून निघताना प्रोटोकॉल नियमां नुसार ड्रेसिंग –कपडे परिधान करणे इतरही नियम पाळणे. हॉल टिकिट सोबत ठेवणे पानी, घड्याळ नियमानुसार असणे वेळे आधी परीक्षा केंद्रावर आल्याने घाई गडबड होत नाही.

महत्वाचे म्हणजे रात्रीची झोप शांत होणे आवश्यक आहे. जास्त जागरण करू नये. सकाळी जेवण करावे काहीतरी पोषक खावे, परीक्षेला जाताना उपाशी राहू नये पाणी व्यवस्थित प्यावे. परीक्षा काळात साधेपण पोषक आहार घ्यावे, अतितिखट, मसाले, आंबवलेले, बाहेरचे पॉकेटमधील अन्न खाऊ नये. परीक्षा काळात आहार साधा, पोषक, सहज पचणारे असावा. परीक्षा केंद्रावर आल्यानंतर वातावरण हलकफुलक असाव . उगाचच टेंशन घेऊ नये, आपण अभ्यास केलेला आहे, त्यामुळे कोणताही प्रश्न आपण सोडवू शकतो हा आत्मविश्वास असावा.

परीक्षा केंद्रावर आल्यानंतर तसेच समोर पेपर पाहून नविन वातावरण पाहून घाबरु नये. शांत रहावे. जर घबराहट वाटले, धडधड वाटली थरथर वाटली तर मनाला स्वतः सांगावे. शांत रहा सर्व छान होईल घाबरु नका रिलॅक्स रहा, रडू नका. या वेळी फक्त श्वासावर लक्ष्य द्यावे. थोडा वेळ श्वास घ्या श्वास सोडा असे दीर्घश्वसन करावे. श्वास मोकळा घ्यावा. साधारणतः आत घेताना, श्वास ४ सेकंद व श्वास सोडताना सहा सेकंद असे प्रमाण असावे. असे २ ते ५ वेळा करावे. किंवा मोकळा श्वास आत घेऊन सोडताना मेणबत्ती फुंकल्यासारखे फू करून श्वास सोडावा असे श्वासावर लक्ष्य दिल्याने ताण कमी होतो व परीक्षेवर लक्ष्य केंद्रित करावे. पेपर हाती आल्यानंतर उत्तरपत्रिका यावर आपला नंबर इ. व्यवस्थित लिहावे उपस्थित शिक्षकांचे मार्गदर्शन घ्यावे, चुका करू नयेत. त्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन काटेकोरपणे करावे. प्रश्न स्वतःला जसे येतात तसे सोडवावे इतरांना काही विचारून डिस्टर्ब करू नये, शंका असल्यास गारडींगला असलेल्या सर मॅडमशी संपर्क साधावा.

**कॉपी करू नये**

स्वतःच्या हिंमतीने अभ्यास करून मिळवलेले मार्कस – आयुष्यभर उपयोगी पडतात, त्यामुळे आपला पेपर सोडवताना शांत राहून मन एकाग्र करून उत्तरे लिहावीत. अस्वस्थता कोणताही प्रश्न वाचून अस्वस्थ होऊ नये. घाबरु नये, वाटल्यास थोडा वेळ दीर्घ श्वसन करावे, आपणास जे प्रश्न सोपे वाटतात ते आधी सोडवावे नंतर कठिण प्रश्न सोडवावे, मन आनंदी ठेवावे. वेळेचे नियोजन प्रश्नांच्या मार्कानुसार उत्तरे लिहिताना वेळेचे नियोजन असावे त्यामुळे वेळ पुरतो अन्यथा एकाच प्रश्नात वेळ जास्त गेल्याने वेळेचे गणित बिघडू शकते म्हणून वेळेकडे लक्ष्य असावे. हस्ताक्षर हस्ताक्षर सुवाच्य , सुंदर वाचता येण्या सारखे असावे. घाईघाईत खराब अक्षर असू नये. सुटसुटीत ,मुद्देसूद लिहावे. एक पेपर झाल्यावर परीक्षा काळात ज्या दिवशी जो पेपर असेल त्या पेपर झाल्यानंतर उगाचच त्याबद्दल चर्चा करत वेळ वाया घालवू नये, दुसरा पेपरची लगेच तयारी सुरु करावी सगळ्यात शेवटी संपूर्ण विषयांचे पेपर्स झाल्यानंतर त्यावर चर्चा करावी. यशस्वी व्हा आनंदी वातावरणात, हसत खेळत परीक्षा द्यावी, काळजी, चिंता करू नये. पालकांनी घरातील वातावरण शांत व उत्साही असावे उगाचच परीक्षेचा बाऊ करू नये, अवास्तव अपेक्षांचे ओझे देऊ नये, घाबरून जाऊ नये. स्ट्रेस न घेता शांत चित्ताने पेपर सोडवावा व यशस्वी व्हावे, सर्वांना खूप खूप शुभेच्छा यशस्वी भव.

टीप– परीक्षा काळात काही अडचण आल्यास विद्यार्थी विद्यार्थिनी पालक कधी ही फोन करू शकतात.

**–डॉ. पुष्पा गायकवाड,**
**वैद्यकीय अधिकारी जिल्हा रुग्णालय**
**नांदेड. मो– ९४२२८६२६२५**

# जि.प.शाळा टिकली तर गावची मुले अधिकारी होतील

## रावसाहेब पा मोरे यांचा ग्रामस्थांना सवाल

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

प्रत्येक नागरिकांनी आपल्या गावातील शाळा वाचवायच्या असतील, तर इंग्रजी माध्यमाच्या दिखाऊ वृतीला व खाजगी शाळेच्या आमिषला कोणत्याही भूलथापांना बळी न पडता . आपली मुले बिनधास्त पणे जिल्हा परिषदेच्या शाळेतच पाठवावे असे आव्हान इकळी मोरे येथील माजी सरपंच व शिक्षण प्रेमी नागरिक रावसाहेब पाटील मोरे यांनी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगावरून बोलताना आपले प्रांजळ मत मांडले आहे.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शाळेमध्ये अनेक उपक्रमाचे आयोजन केले होते याप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनही केले होते या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून रावसाहेब पाटील मोरे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित होते तर यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर वडजे हे होते तर प्रमुख अतिथी मध्ये गावातील सरपंच सौ गंगासागर मोरे,साहेबराव मोरे सुधाकर पाटील यलापुरे,सुरेश भद्रे गावचे पोलीस पाटील




अविनाश मोरे नजीर साहब शेख इस्माईल शेख हे होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक शाळेचे मुख्याध्यापक पि डी वाघमारे यांनी केले कार्यक्रमाची सुरुवात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून सदर जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकाने सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार केला, पुढे बोलताना रावसाहेब पाटील म्हणाले या देशाच्या मुख्य पदावर आतापर्यंत कार्यरत असलेले जिल्हाधिकारी पोलीस अधिकारी प्रत्येक क्षेत्रात असलेले अन्य अधिकारी हे जिल्हा परिषद शाळेतच शिकलेले आहेत आता जिल्हा परिषद शाळेमध्ये खाजगी शाळेला लाजवेल अशा डिजिटल शाळा निर्माण केल्या आहेत जिल्हा परिषद मध्ये देणारे ज्ञान हे सर्व समावेशक असून ते मुलांना आयुष्यभर पुरवणारे आहे म्हणून प्रत्येक गावच्या जिल्हा परिषद शाळा वाचवायला हव्यात, गावकऱ्यांनी यासाठी निर्धार केला पाहिजे, आपली मुले जिल्हा परिषद शाळेत पाठविण्यासाठी आपण सर्व पालकांनी कटिबद्ध राहावे असेही ते आवर्जून सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भीमराव बैलके यांनी केले तर यावेळी श्यामसुंदर निवळीकर लालू जोडवाड, महेश चौधरी, सौ. जयश्री टरके, तिरुपती मोटारगे, सुरेश भद्रे विश्वंभर बोयाळ, प्रकाश पांचाळ, नागोराव डोईवाड यासह गावातील महिला पुरुष यांची सांस्कृतिक कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# परीक्षेस सामोरे जाताना विद्यार्थी मित्रानो आत्मविश्वासाने सामोरे जा-शेख अब्दुल रहीम

लोकनेता न्युज नेटवर्क

विद्यार्थिदशेतील आणि एकूणच आयुष्यात अत्यंत महत्त्वाच्या आणि पुढील आयुष्याची दिशा घडवणार्या बारावीच्या परीक्षा उद्या पासून सुरू होत आहे. दहावी परीक्षेसाठी साठी काही दिवस उरलेले आहे. उरलेले दिवस म्हणजे परीक्षापूर्व कालावधी आणि प्रत्यक्ष परीक्षेचा कालावधी हा अत्यंत महत्त्वाचा आहे. वर्षभर केलेल्या अभ्यासापेक्षाही उज्ज्वल यशाची वाट दाखवण्यासाठी या काळाचे खूप महत्त्व आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनाचा विचार केला, तर दहावी–बारावीच्या परीक्षा या त्यांचे पुढचे जीवन घडवणार्या, पुढच्या आयुष्याची दिशा ठरवणार्या आणि भावी यशाची पायाभरणी करणार्या असतात. या परीक्षांमधील यशामुळे आई–बाबांना, संपूर्ण कुटुंबालाच आनंद प्राप्त होत असतो. यातील यशामुळे मुलांची समाजातील किंमत वाढते. इतकेच नाही, तर आपण मिळवलेल्या यशाचे स्वतःला समाधान मिळते. आत्मिक आनंद आणि आत्मविश्वास या परीक्षांमधून मिळत असतो. म्हणूनच या अत्यंत महत्त्वाच्या परीक्षा आहेत...

परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी व पालकांनी १० सुत्री टिप्स लक्षात घेणे गरजेचे आहे...

१) योग्य आहाराकडे लक्ष द्या...
२) परीक्षा केंद्रावर लवकर पोहचा...
३) ताणतणाव घेऊ नका...
४) पुस्तकापेक्षा तुम्ही तयार केलेल्या नोट्स वाचा...
५) नकारात्मक विचार येऊ देऊ नका...
६) परीक्षेला सामोरे जाताना स्वतःला प्रेरित करा...
७) प्रवेशपत्र सोबत ठेवा...
८) हातात घड्याळ घेऊन जा, घड्याळाकडे लक्ष ठेवा...
९) प्रश्नपत्रिकेतील सर्व सूचना काळजीपूर्वक वाचा...
१०) प्रथम काठिण्य पातळी सोपी असणारे प्रश्न सोडवावेत...

# आजपासून बारावी बोर्डाची परीक्षा:१५ लाखांहून अधिक विद्यार्थी देणार परीक्षा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्रात आता उद्यापासून दिनांक ११ फेब्रुवारीपासून बारावीच्या परीक्षा सुरू होणार आहेत. ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत बारावीची परीक्षा होणार आहे. यंदाच्या वर्षी बारावीच्या परीक्षेला एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. या एकूण संख्येपैकी ८ लाख १० हजार ३४८ मुले, तर ६ लाख ९४ हजार ६५२ मुली आहेत. या परीक्षेला ३७ तृतीयपंथी नागरिकांनी देखील नोंदणी केली आहे.महाराष्ट्रात एकूण १० हजार ५५० कनिष्ठ महाविद्यालयातील या विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली असून या परीक्षेसाठी संपूर्ण राज्यातील विद्यार्थ्यांसाठी ३ हजार ३७३ मुख्य केंद्रावर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. विज्ञान शाखेला ६८ हजार ९६७ विद्यार्थी, कला शाखेला तीन लाख ८० हजार ४१० विद्यार्थी, वाणिज्य शाखेला तीन लाख १९ हजार ४३९ विद्यार्थी तर किमान कौशल्य आधारित अभ्यासक्रम ३१ हजार ७३५ विद्यार्थी आहेत. टेक्निकल सायन्स ४ हजार ४८६ असे एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थी यंदा परीक्षा देणार आहेत, अशी माहिती माहिती मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

# दीनदयाल विद्यालयात रंगला माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा



लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । प्रतिनिधी**

शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालय दे.राजा जि बुलढाणा येथे आज रविवार दि.०९फेब्रु२०२५ रोजी माजी विद्यार्थ्यांचा हृदय स्पर्शी स्नेह मेळावा पार पडला.

या प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी शिप्रमंडळाचे संचालक मा.अशोकभाऊ कोटेचा,प्रशासकीय संचालक श्री.अरविंदभाऊ शिंगणे, संचालक श्री.बाबासाहेब मिनासे,श्री.छबुरावजी भावसार, माजी प्राचार्य श्री.प्रकाशजी वायकोस,धर्मराज हनुमंते, भगवानराव कायंदे, माजी पर्यवेक्षक,श्री.रमेश डोईफोडे, विकासजी बोबडे, त्र्यंबकराव जायभाये काका,श्री.अमोलजी सुरळीकर,से.नि शिक्षक श्री. पंजाबराव टेकाळे,श्री. सोपानराव वाघ आदी उपस्थित होते.

या प्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी शाळा आणि शिक्षकांबद्दल च्या आठवणींना मनोगत व्यक्त करतांना उजाळा दिला. से.नि शिक्षक श्री.टेकाळे सर यांनी भावपूर्ण शब्दात जुन्या आठवणी व्यक्त केल्या, माजी प्राचार्य श्री.वायकोस सर यांनी मिळालेले सहकारी शिक्षक आणि संचालकांचा विश्वास यामुळेच समर्थपणे प्राचार्य म्हणुन कार्य करू शकलो असे सांगितले .तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.अशोकभाऊ कोटेचा यांनी माणसाने मित्र आणि सहकारी यांच्या सोबतचे ऋणानुबंध कायम जपावेत असे प्रतिपादन केले.या संपुर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.सरोदे सर यांनी तर प्रास्ताविक प्राचार्य श्री.सुरेशजी गारडे सर यांनी केले शेवटी पर्यवेक्षक श्री. एस.एन व्यास सर उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक – शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी यांनी अथक परिश्रम घेतले.

# संविधान प्रेमी नागरिकांकडून ईव्हीएमची होळी !

लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**



आम्ही भारताचे लोक ' या बॅनरखाली गेल्या ४० दिवसांपासून विभागीय आयुक्त कार्यालयासमोर सुरू असलेल्या ईव्हीएम हटाव संविधान बचाव आंदोलनाच्या ठिकाणी आज लोकशाही आणि देशासाठी घातक ठरणाऱ्या ईव्हीएमचे प्रतीकात्मक दहन करण्यात आले. पत्रकार पंडित गायकवाड यांच्या नेतृत्वात ४० दिवसांपासून हे आंदोलन सुरू आहे. यावेळी भूमिपुत्र जनपार्टी पक्षाचे नेते मधुकर भोळे, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. महादेव आंधळे, संविधान अभ्यासक अनंत भवरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना ॲड. महादेव आंधळे म्हणाले की सध्याचा निवडणूक आयोग हा सरकारच्या ताटा खालचे मांजर बनले असून ते जनतेच्या मताला काहीही किंमत देत नाही. त्यामुळे आपली मागणी रेटण्यासाठी अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन करावे लागेल. निवडणूक आयोगाला वठणीवर आणण्यासाठी आणि त्यांनी लोकांच्या भावनेचा आदर करावा कारण लोकशाहीत जनताच सर्व श्रेष्ठ आहे असे मत मधुकर भोळे यांनी मांडले. लवकरच विभागीय आयुक्त कार्यालयासमोर रस्ता रोको आंदोलन करून ईव्हीएम हटविण्याची प्रखरतेने लढा उभारला जाईल असा इशारा त्यांनी यावेळी बोलताना दिला. जोरदार घोषणाबाजी करीत ईव्हीएम म्हशींनच्या प्रतिकृती जाळण्यात आल्या, यावेळी अशोक जायभाये, रामराव दाभाडे, विष्णू वाखारे, राजू भालेराव, सिद्धार्थ हिवराळे, राजश्री देबाजे, श्रीमती बनकर, आदींची उपस्थिती होती. लोकसभा आणि विधान सभा निवडणुका ईवीएम मशीन वर घेण्यात आल्या आहेत. राज्या मधे होणाऱ्या निवडणुका महानगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिति, ग्राम पंचायत चे नीवडणुका आता तरी मत पात्रिका वर घेण्यात यावे या मागणी साठी पत्रकार पंडीत गायकवाड़ हे बेमुदत साखळी उपोषण करीत आहे विभागीय आयुक्त कार्यलय दिल्ली गेट समोर बेमुदत उपोषणा ला चाळीस दिवस होत आहे. अनेक पत्रकार, वकील, विविध पक्षा चे नेते, कार्यकर्ते, संघटना ने पाठिंबा दिला आहे.

# आदर्श विद्यालयाची तीन दिवसीय शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**



शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित आदर्श माध्यमिक विद्यालयाची तीन दिवसीय शैक्षणिक सहल दिनांक ५ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी दरम्यान उत्साहात संपन्न झाली. विद्यार्थ्यांना विविध ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक अनुभव शिक्षणात उपयोगी पडावे या दृष्टीने सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

सहलीत देवगड, रांजणगाव, तुळापूर, आळंदी, देहू,काशीद बीच,पाचाड, रायगड किल्ला, महाबळेश्वर आणि जेजुरी इत्यादी ठिकाणे दाखवली.सदर सहलीसाठी एस टी महामंडळाच्या २ बसेस असून त्यामध्ये ७९ विद्यार्थी सहभागी झाले होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री सुभाष मोरे सर, सहल प्रमुख श्री. आर.जे.मेहेत्रे,श्री.एस.टी.चौधरी, श्री. एम.एस.दांडगे, श्री.एस.एस.भुतेकर, श्री.पी.एम.मापारी, कु.के.एस.गोरे, कु.एन.व्ही.काकडे या ८ शिक्षक व शिक्षिका यांचा सहभाग होता.

# भोकर जिल्हा सत्र न्यायालयाच्या विस्तारीत इमारतीमुळे

# न्यायव्यवस्था अधिक गतिमान होऊन नागरिकांना न्याय मिळेल-न्यायमूर्ती सुर्यवंशी







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

भोकर जिल्हा सत्र न्यायालयाच्या विस्तारित इमारतीमुळे येथील न्यायव्यवस्था गतिमान व कार्यक्षम बनुन सर्व सामान्य आणि गरीब जनतेला हक्काचा न्याय मिळेल असे मत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री नितीन सूर्यवंशी यांनी बोलताना व्यक्त केले.ते भोकर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या विस्तारीत इमारतीच्या उदघाटन व लोकार्पण सोहळ्याच्या प्रसंगी बोलत होते.

भोकर येथील सुमारे १४ कोटी ५१ लाख ६५ हजार रुपये खर्च करून बांधलेल्या अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नूतन विस्तारीत न्यायालयीन इमारतीचा उद्घाटन न्यायमूर्ती नितीन भगवंतराव सुर्यवंशी यांच्या हस्ते पार पडले.यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एस.पी.ब्रम्हे, राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, खासदार रविंद्र चव्हाण,आमदार श्रीजया चव्हाण,प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुरेखा कोसमकर,बार कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र ण्ड गोवाचे सदस्य ड.व्ही.डी.सांळुखे,ड.सतिश देशमुख,बार कॉन्सिल ऑफ इंडिया ण्ड गोवाचे सदस्य ड.आशिष देशमुख,जिल्हा न्यायालय भोकरचे युनुस खान खरादी, सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली, रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापक निती सरकार, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर,अपर पोलीस अधिक्षक सुरज गुरव आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की लोकशाही सशक्त बनविण्यासाठी न्याय व्यवस्था मजबूत असणे गरजेचे असते.त्यामुळे न्याय व्यवस्थेत मुलभूत सुविधा प्राप्त करुन देणे आवश्यक आहे.यामुळे न्यायव्यवस्था अधिक कार्यक्षम होईल व यातून एक नवीन पर्व सुरु होईल. जिल्हा सत्र न्यायालयाच्या या नूतन विस्तारीत इमारतीमुळे सर्वांना पोषक वातावरण मिळून न्यायालयात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळेल असा विश्वास व्यक्त केला. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा नांदेड जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती नितीन भगवंतराव सुर्यवंशी यांनी व्यक्त केला. माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते यापूर्वी भोकर येथील जिल्हा सत्र न्यायालयाच्या इमारतीचे भूमिपूजन झाले होते.आज त्यांच्याच उपस्थितीत या नूतन इमारतीचे उद्घाटन व लोकार्पण होत आहे. त्यांच्या प्रयत्नामुळेच ही इमारत पूर्णत्वास गेली असल्याचे न्यायमूर्ती नितीन सुर्यवंशी यांनी सांगितले. न्यायालयात परिसरात काम करणाऱ्यांनी आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहून न्यायालयीन प्रक्रीया अधिक सक्षम बनविण्यावर भर द्यावा. तसेच ही इमारत स्वच्छ व सुंदर राहील यासाठी प्रयत्न करावेत असेही सांगितले.

या कार्यक्रमात मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मा.एस.पी. ब्रम्हे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की कुठलीही वास्तू उभी राहण्यासाठी अनेक संघर्षाचा सामना करावा लागतो. तशेच अनेक कष्टकऱ्यांचे योगदानही या इमारतीच्या बांधकामासाठी लाभले आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या विशेष प्रयत्नातून ही इमारती उभी राहीली असल्याचे प्रतिपादन त्यांनी बोलताना केले.नवीन इमारतीसोबत इतर सोयी-सुविधाही हळूहळू सुरु करता होतील.विधीज्ञ व न्यायालयीन अधिकारी कर्मचाऱ्यांनी तळागाळातील पक्षकार हा केंद्रबिंदु ठरवून कामकाज करावे तसेच बदलत्या परिस्थितीत वकीलांनी न्यायापासून वंचित असणाऱ्या लोकासाठी काम करावे असे सांगितले.या कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या हस्ते रोपाला पाणी देवून करण्यात आली.यावेळी बार कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र ण्ड गोवाचे सदस्य ड. व्ही.डी. साळुंखे, ड. सतिश देशमुख, बार कॉन्सिल ऑफ इंडिया ण्ड गोवाचे सदस्य ड. आशिष देशमुख, प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुरेखा कोसमकर यांनीही मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक भोकर अभिवक्ता संघाचे अध्यक्ष ड.संदिप भिमराव कुंभेकर यांनी तर आभार जिल्हा न्यायालय भोकरचे युनुस खान खरादी यांनी मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर के.पी. जैन देसरडा तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर भोकरचे ए. पी. कराड यांनी केले.शेवटी राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच शिक्षणाचे ध्येय-मा.आ.संतोष दानवे

## सरस्वती इंग्लिश स्कूल व विद्यालयांमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**



भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथील प्रसिद्ध शाळा सरस्वती विद्यालय व सरस्वती इंग्लिश स्कूल पिंपळगाव रेणुकाई यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक ८.०२.२०२५ वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या थाटामाटात संपन्न झाला तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक मा.आ. संतोष पाटील दानवे भोकरदन जाफराबाद विधानसभा, या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लाभले ह भ प ज्ञानेश्वर माऊली शेलुदकर अखंड व्यसनमुक्ती प्रसारक, प्रमुख अतिथी, मा श्री सुरेश पाटील बनकर ज्येष्ठ नेते सिल्लोड सोयगाव मतदारसंघ, गणेश पाटील ठाले भाजपा तालुका अध्यक्ष भोकरदन, परमेश्वर लोखंडे मा.सभापती पंचायत समिती भोकरदन, गणेश लोखंडे पंचायत समिती सदस्य भोकरदन, अशोकराव गरुड मा सभापती पंचायत समिती सदस्य सिल्लोड, डॉक्टर तांदूळजे सामाजिक कार्यकर्ते, मा श्री सुकलाल बोडखे, उपसभापती पंचायत समिती भोकरदन, मोतीराम अण्णा नरवाडे संचालक रामेश्वर कारखाना, अंबादास शेठ बावस्कर मा. जी प सदस्य जालना, कौतिकराव पाटील जगताप सभापती कृषी उत्पादन भोकरदन, ह भ प विष्णु महाराज सास्ते भागवताचार्य पिंपळगाव, अरुण पाटील काळे मा उपसभापती पंचायत समिती सिल्लोड, श्री सांडू पाटील वाघ भाजपा तालुका उपाध्यक्ष, सौ सुनीताताई सपकाळ जिल्हा परिषद सदस्य जालना, कार्यक्रमाचे विशेष आकर्षक जु भाऊ कदम, सिद्धार्थ सोनवणे १५२ मिमिक्री आवाजाचा बादशाह, आपले विनीत.. राजेंद्रजी देशमुख अध्यक्ष, श्री रावसाहेब देशमुख उपाध्यक्ष, श्री सुभाष देशमुख सचिव, श्री शंकरराव देशमुख सहसचिव, श्री एन एम लोखंडे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री एके बावस्कर प्रशासकीय अधिकारी, श्री डी ए गोरे प्राचार्य इंग्लिश स्कूल, श्री डी टी खंडाळकर प्राचार्य सरस्वती विद्यालय, श्री एम व्ही देशमुख उपप्राचार्य सरस्वती विद्यालय, पंचक्रोशीतील पालक मंडळी आयोजक मंडळी सन्माननीय संचालक व सांस्कृतिक विभाग प्रमुख शिक्षक वृंद शिक्षक तर कर्मचारी तसेच सर्व कर्मचारी वृंद सरस्वती परिवार पिंपळगाव रेणुकाई

# यशामध्ये जिल्हा परिषद शाळेचे व शिक्षकांचे महत्वपूर्ण योगदान



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

शाळा ही समाजाचा आरसा असते. अतिशय प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देऊन शासकीय सेवेत प्रविष्ट होण्याची माझे स्वप्न आज पूर्ण झाले आहे, या यशामध्ये पिंपरी दुमाला जिल्हा परिषद शाळा व शिक्षकांचे अनमोल योगदान आहे,अशी भावना मुंबई शहर पोलीस पदी नियुक्त झालेल्या साहिल चिखले यांनी व्यक्त केली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपरी दुमाला येथील माजी विद्यार्थी साहिल चिखले यांची मुंबई शहर पोलीस पदी निवड झाल्याबद्दल शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी पिंपरी दुमालाचे सरपंच महेंद्र डोळस,ग्राम विकास अधिकारी विशाल ढसाळ,तंटामुक्ती अध्यक्ष अमोल चिखले, सोमेश्वर देवस्थान विश्वस्त श्रीकांत सोनवणे,विनायक सोनवणे, अक्षय नवले,अनिकेत चिखले,शोभा डोळस इ.मान्यवर उपस्थित होते. हलाखीची परिस्थिती सहन करत वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी महत्त्वपूर्ण यश मिळवल्याबद्दल वर्गशिक्षक राहुल चातुर व कांताराम शिंदे यांनी साहिल चिखले यांचे कौतुक व अभिनंदन केले. ग्रामविकास अधिकारी विशाल ढसाळ यांनी चिखले यांच्या यशामागील अविरत प्रयत्न नमूद करतानाच उपस्थित विद्यार्थ्यांना मोबाईल पासून दूर राहण्याचा मोलाचा सल्ला दिला.शाळेच्या माजी विद्यार्थ्यांने मिळवलेल्या यशाबद्दल शालेय समिती अध्यक्ष शशिकांत चिखले, उपाध्यक्ष वर्षा खळदकर यांनी कु.साहिल चिखले यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पालदेवाड सरांचे PCC कोचिंग क्लासेसच्या वतीने इयत्ता १०,१२ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**




उमरी:पालदेवाड सरांचे PCC कोचिंग क्लासेस च्या वतीने दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर अर्जुन शिंदे सर,प्रमुख पाहुणे म्हणून माननीय युवा नेते कैलास भाऊ देशमुख गोरठेकर,(संचालक.नां.जिल्हा मध्यवर्ती बँक),प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.संतोष गिरी सर(संचालक गिरी केमिस्ट्री क्लासेस नांदेड), प्रा.मुधळकर सर प्रा.डॉ.राहठीकर सर ,प्रा.सूर्यवंशी सर, नागेश बट्टेवाड, उद्धव रावजी मामडे(ता.प्रतिनिधी दैनिक हिंदु सम्राट), प्रा.बड्डेवाड सर, सीमा मॅडम तसेच पालक किशनरावजी पवार हे उपस्थित होते. आज निरोप समारंभाच्या निमित्ताने दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांना क्लासेस चे संचालक प्रा.पालदेवाड सर यांनी प्रास्ताविके तून सांगीतले की,आज क्लासेस लां बारा वर्ष पूर्ण झाले,आणि यामध्ये कित्येक विद्यार्थ्यांना घडवण्याचं काम हे क्लासेस ने केलेले आहे.त्याचबरोबर यावर्षी कोरोनाच्या नंतर १२ वी वर्गाच्या सर्व विषयाचा अभ्यासक्रम यशस्वी अभ्यास पूर्ण करण्यात आलेली आहे.तसेच येणाऱ्या काळात तालुक्याच्या ठिकाणावरून डॉक्टर आणि इंजिनियर घडून दाखवू ते पण कमीत कमी फीस मध्ये ,तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले कैलास भाऊ देशमुख यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले की,झउउ पासून तुम्ही निरोप घेऊ शकत नाही तर येणाऱ्या काळात तुम्ही तुम्हाला जेव्हा जेव्हा गरज वाटेल तेव्हा तेव्हा झउउ ची टीम आणि आम्ही तुमच्या सोबत आहोत , त्याच बरोबर ह्या भागातील प्रत्येक विद्यार्थी शिकला पाहिजे, हे स्वप्ने कै.बाबासाहेब देशमुख गोरठेकर कर साहेब आणि कै.बापूसाहेब देशमुख गोरठेकर यांचे होते म्हणून आज तोच वारसा चालवत आम्ही दोन्ही बंधू ह्या भागातील सामान्य जनतेसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी.करू आणि येणाऱ्या काही दिवसात १२ वि नंतरच्या प्रत्येक फॅकल्टी नर्सिंग कोचिंग, ळींळ,विविध सुविधा उपलब्ध करू आपल्या भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही ह्याची काळजी घेऊ,तुम्ही खूप अभ्यास करा पास होऊन आईवडील चे स्वप्न पूर्ण करा.असे आश्वासन दिले.त्याच बरोबर पालदेवाड सर आपण चांगले ज्ञानदानाचे कार्य क्लासेस च्या माध्यमातून करा मी, तुमच्या पाठीशी आहे असे सांगितल,त्याच बरोबर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा.संतोष गिरी सर हे विद्यार्थ्यांना सखोल असेल मार्गदर्शन केले तर उत्कृष्ट सूत्र संचालक १२ वी वर्गातील सारिका खांडरे आणि स्वाती बक्केवाड यांनी केले तर आभार प्रा.डॉ राहठिकर सर यांनी मांडले.

# जगाचा संसार सुखाचा व्हावा म्हणून स्वतःच्या संसाराची राख रांगोळी करून घेतात त्यांनाच संत म्हणतात-ह.भ.प.गजानन महाराज पैठणकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**



जगाचा संसार सुखाचा व्हावा म्हणून स्वतःच्या संसाराची राख रांगोळी करून घेतात त्यांनाच खरे संत म्हणतात व ते या जगात अजरामर राहुन बहुजन समाजाला आपल्या शिकवणीतून अंधकाराच्या गर्गेतून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करत असतात असे मौलिक विचार भागवताचार्य ह.भ.प.गजानन महाराज जुनगडे पैठणकर यांनी काल्याच्या कीर्तनातून बोलताना व्यक्त केले.ते भोकर शहरातील म्हैसा रोड वरील प्रभू विश्वकर्मा मंदिरात प्रभू विश्वकर्मा प्रगटन दिन तथा चतुर्थ कलशारोहण वर्धापन दिनानिमित्त आयोजित श्रीमद् भागवत कथा सप्ताहाच्या सांगते निमित्त काल्याच्या कीर्तनातून बोलत होते.

संत महात्मे हे कधीच स्वतःसाठी जीवन जगत नसतात तर जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती परोपकारे ।। या न्यायाने ते आपले जीवन जगून सर्वसामान्य बहुजन समाजातील लोकांच्या उद्धारासाठी आपले शरीर व आपली वाणी झिजवत असतात.

अवघाची संसार सुखाचा करीन । आनंद भरीन तिन्ही लोकी ।। हा व्यापक संकल्प घेऊन संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम महाराज यांनी जीवन जगले.समाजाच्या उत्थानासाठी व उत्कर्षासाठी स्वतःच्या संसाराची राख रांगोळी केली म्हणून त्यांची कीर्ती चंद्र सूर्य असेपर्यंत या जगात अजरामर राहणार आहे.तेव्हा त्यांनी दिलेली मौलिक शिकवण आत्मसात करून प्रत्येक व्यक्तीने आपले आयुष्य सुखाने व आनंदाने जगावे आणि या जन्माचे सार्थक करून घ्यावे असे मार्गदर्शन केले.तसेच काला हा व्यक्तीला व्यापक बनवून भगवंतापर्यंत घेऊन जातो. म्हणूनच प्रत्येक धार्मिक कार्यक्रमाच्या शेवटी काल्याचे किर्तन असते.यातून आपण आपली खरी ओळख करून घ्यायची असते व मिळालेल्या अमूल्य नर जन्माचे सार्थक साधायचे असते असे सांगितले.

या किर्तन सोहळ्याला शहरातील व परिसरातील हजारो भाविक भक्त तथा माता-भगिनी उपस्थित होत्या दुपारी १२ वा. पुष्पवृष्टी करून विराट प्रभू विश्वकर्मा भगवान यांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.त्यानंतर दहीहंडी फोडून सर्वांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या महाप्रसादाचा लाभ शहरातील व परिसरातील शेकडो भाविक भक्तांनी व माता-भगिनी घेतला. हा धार्मिक कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विश्वकर्मा प्रतिष्ठान भोकर, विश्वकर्मा युवा संघ भोकर,विश्वकर्मा महिला संघ भोकर व समस्त विश्वकर्मीय ज्येष्ठ मंडळी भोकर तालुका यांनी मोलाचे योगदान दिले.

# मा.आ.साहेबराव दरेकर यांना जीवन गौरव तर प्रा.डॉ.बोडखे शैक्षणिक कार्यगौरव पुरस्कार प्रदान

लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आष्टीचे माजी आमदार,जेष्ठ नेते साहेबराव दरेकरनाना यांना शब्दगंध जीवन गौरव तर कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डा.जी. पी.बोडखे यांना शब्दगंध शैक्षणिक कार्यगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.शब्दगंध साहित्य संमेलनामध्ये हा मानाचा पुरस्कार पद्मश्री पोपटराव पवार,आ.संग्राम जगताप, शब्दगंध साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षा,जेष्ठ साहित्यिका प्रा.डा.श्रीमती संजीवनी तडेगावकर यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी माजी जि.प.सदस्य देवीदास धस, शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजेंद्र उदागे,कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे,सचिव सुनील गोसावी, अभिषेक कळमकर आदि मान्यवर उपस्थित होते.शब्दगंध साहित्यिक परिषद आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ यांच्यावतीने १६ वे. राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन अहिल्यानगर येथे ज्येष्ठ साहित्यिका,संमेलनाध्यक्ष प्रा.डॉ.श्रीमती संजीवनी तडेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली दि.८ व ९ फेब्रुवारी रोजी पार पडले.

शब्दगंधच्यावतीने नवोदित लेखक,कवींना प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळावे यासाठी वर्षभर विविध साहित्यिक उपक्रम राबवण्यात येतात. त्यामध्ये कथाकथन, काव्यवाचन,परिसंवाद, चर्चासत्र,कथा,काव्यलेखन स्पर्धा,विविध पुरस्कार वितरण, पुस्तक प्रकाशन, बालसंस्कार शिबिर असे विविध उपक्रम राबवण्यात येतात.दरवर्षी राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन आयोजित करण्यात येते.त्यामध्ये एका ज्येष्ठ साहित्यिक



आणि एका सामाजिक कार्यकर्त्याच्या कार्याची दखल घेऊन त्यांना शब्दगंध जीवन गौरव आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पुरस्कार देण्यात येतो.यावर्षीचा शब्दगंध जीवन गौरव पुरस्कार सन २०२५ या पुरस्कारासाठी आष्टीचे माजी आमदार,ज्येष्ठ नेते साहेबराव दरेकरनाना यांना हा पुरस्कार जाहीर झाला होता.रविवार दि.९ फेब्रुवारी रोजी अहिल्यानगर येथील कोहिनूर मंगल कार्यालयात हा पुरस्कार वितरण सोहळा झाला.शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.गोपीनाथ बोडखे यांना शब्दगंध शैक्षणिक कार्यगौरव पुरस्कार – २०२५ ने सन्मानित करण्यात आले. प्रत्येक वर्षी राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन आयोजित करण्यात येते. त्यामध्ये शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची दखल घेऊन शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल शब्दगंध शैक्षणिक कार्यगौरव पुरस्कार देण्यात येतो.या वर्षीच्या पुरस्कारासाठी कड्याचे प्रा. डॉ.गोपीनाथ बोडखे यांना जाहीर झाला होता.रविवार दि. ९ फेब्रुवारी रोजी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ.हरिदास विधाते, सुनिल गोसावी,अध्यक्ष राजेंद्र गोसावी,कार्याध्यक्ष पांडुळे, सहसचिव प्रा.डॉ.अनिल गर्जे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, डॉ.राम बोडखे,उपप्राचार्य डॉ.भास्कर चव्हाण,प्रा.डा. बाळासाहेब धोंडे,चव्हाण, उपप्राचार्य डॉ.संभाजी वाघुले, उपप्राचार्य डॉ.बापु खैरे,प्रा. आर.जी.विधाते,प्रा.डा.विनोद ढोबळे,सेवानिवृत पीएसआय शेख अन्सारभाई,चेअरमन बबन नन्नवरे,माऊली बोडखे,मुख्याध्यापक साईनाथ बोडखे, इजि.पी.बी.बोडखे,डॉ.एम. आर.पटेल,डॉ.शाम सांगळे,प्रा. अविनाश भवर,डॉ.भीमराज गावडे,डॉ.सज्जन गायकवाड आदि मान्यवर उपस्थित केले.

# आता बॉन्ड पेपर पत्रका आधारे फेरफार केल्यास कारवाई;तहसीलदार यांनी काढले आदेश

## माजी सैनिक संघटनेच्या मागणीला आले यश!

लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे

कंधार तहसील कार्यालयामार्फत शेती एकमेकांच्या नावांवर करण्यासाठी तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यामार्फत अनधिकृत प्रक्रिया करून लावण्यात येत होती. त्यामुळे आर्थिक नुकसान होत होते. मात्र आता बॉण्डपेपरवर वाटणी पत्रकाआधारे फेरफार घेतल्यास शिस्तभंगाची कारवाई केली,जाणार आहे.असे आदेश तहसीलदारांनी मंडळ अधिकारी तसेच सर्व महसूल अधिकारी यांना दिले आहेत.

तर अनेक जमीनीवर अतिक्रमण आहे. शासनाच्या गायरान जमीनीवर अतिक्रमण होत असताना यावर लक्ष ठेवणे हे महसुल प्रशासनाचे लक्ष असणे गरजेचे होते,

यामुळे बॉन्ड पेपर वर जमिनी सातबाराला लावू नका असे निवेदन माजी सैनिक बालाजी चुक्कलवाड यांनी जिल्हाधिकारी यांना दिले होते. या निवेदनाच्या आधारे कंधार तहसीलदार यांनी बॉन्ड पेपर वर जमिनी सातबाराला लावू नका नियम ८५/२ च्या आधारेच जमीनी लावा असे आदेश काढले असल्याने माजी सैनिक संघटनेच्या मागणीला अखेर यश आले आहे.

एखाद्या व्यक्तीच्या नावाने दोन एकर गायरान जमिनीचा पट्टा असेल तर त्या व्यक्तीने पाच एकर वर अतिक्रमण केले आहे. शासनाच्या ताब्यात असलेली मोकळी जागा कुठे आहे,हेच शासनाला माहीत नाही. भुमिअभिलेख कार्यालय व तहसील कार्यालयाच्या मस्टरमध्ये ही मोठ्या प्रमाणात गोळ आहे.महसूल विभाग हे भ्रष्टाचार च्या बाबतीत देव माझा असल्याने येथील संबंधित अधिकारी कर्मचारी यांनी पैशासाठी वाटेल ते करून ठेवले आहेत. ज्या लोकांनी प्लॉटिंग विक्रीसाठी आरक्षित जागेचा प्लॅन दाखवला परंतु त्या आरक्षित जागा विकून टाकल्या आहेत. काही लोक तर ही माझीच जागा आहे म्हणून सरळ प्लॉट पाडुन विक्री करत आहेत.अनेक गायरान जागेवर प्लॉटिंग करून एक एक प्लॉट दोन दोन लोकांना विक्री केल्याचे प्रकार हे मोठ्या प्रमाणात घडले आहेत या प्रकरणातले वाद न्यायालयात प्रतिष्ठित आहेत. कंधार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जागेवर ही त्या त्या वेळेच्या संचालकांनी जागेमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करून आपल्या संबंधातील लोकांना जागा विकून टाकल्या आहेत. संबंधित कर्मचारी व अधिकारी याने थोडेफार पैसे घेऊन अनेक जागा नावावर करून देण्याचे धाडस केले आहे. ही बाब लक्षात आल्यामुळे माजी सैनिक संघटनेचे जिल्हा अध्यक्ष बालाजी चुक्कलवाड यांनी सदरील यानंतर बॉन्ड पेपरच्या आधारे जागा सातबारा न लावता १९६६ च्या ८५/२ नियमानुसारच जागा लावण्याचे मागणी जिल्हाधिकारी यांना केली होती. या निवेदनाची दखल घेऊन कंधार तहसीलदार यांनी यानंतर बॉन्डपेपर कोणत्याही जागा न लावता १९६६ च्या ८५/२ नियमानुसारच लावण्याचे आदेश काढले आहेत.

# अभि कलेक्शनचे अभिनेते रमाकांत भालेराव यांच्या हस्ते उदघाटन



लोकनेता न्यूज नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

दि. ९ फेब्रु. रोजी छ.संभाजी नगर येथील टी.व्ही. सेंटर परिसरातील जाधववाडीच्या मुख्य मार्गांवर नवीनच आरंभ केलेल्या अभि कलेक्शनचे ९ फेब्रुवारी २०२५ रोजी साय. ७ वाजता सिने अभिनेते मा. यांच्या भालेराव यांच्या हस्ते उदघाटन सोहळा पार पडला. कार्यक्रमास प्रमुख उपस्तीथी म्हणून मा.सु. मा. शिंदे आर.पी.आय. चे जेष्ठ नेते., डॉ. ॲड. विजयकुमारजी कस्तुरे, डॉ. संघर्ष सावळे हे होते. त्याच बरोबर डॉ.डी. व्ही खरात, डॉ.बबन महामुने, अंकुश पडघान, श्री.मंगेश कुलकर्णी (गुरुजी) विवेक शाक्य, मा.समाधान बाविस्कर, पो.कॉ. सावित्रीताई बाविस्कर, अभिनेत्री संगीता भालेराव, सरगम शाक्य, मा. किसन ताठे, डॉ. रामेश्वर वर्शील ई. मा.वरांच्या उपस्थितीत अभि लेडिस वेअर कलेक्शन चे उदघाट्न सोहळा पार पडला.

# परिक्रमा शैक्षणिक संकुलाच्या विद्यार्थ्यांनी केली जनजागृती व श्रमदान

लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिक्रमा फॅकल्टी ऑफ इंजीनियरिंग व परिक्रमा फॅकल्टी ऑफ फार्मसी अंतर्गत विशेष श्रम संस्कार शिबिर सांगवी दुमाला ता.श्रीगोंदा येथे २६/१२/२०२४ ते ०१/०१/२०२५ या कालावधीत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम आठवडाभर चालला होता. यामध्ये विद्यार्थ्यांनी, डिजिटल लिटरसी, अवयवदान जागृती , दारूबंदी बेटी बचाव बेटी पढाव, व्यसनमुक्ती, मोबाईलचे दुष्परिणाम, मतदान जनजागृती, लोकसंख्या जनजागृती या विषयावर प्रभात फेरी काढून पथनाट्य सादर करून समाज प्रबोधन केले. गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिर,महादेव मंदिर, भैरवनाथ मंदिर, ग्रामपंचायत कार्यालय, शाळा सोसायटी येथील परिसर स्वच्छ करून झाडांना कलर दिला. तसेच झाडे लावून झाडांचे महत्व अधोरेखित केले. या शिबिरामध्ये व्याख्यानमालाचे आयोजन केले होते. डॉ. सौ. प्रतिभा पाचपुते, प्रा. नवनाथ शिंदे, डॉ सुरज गदादे , संदीप पाटील , प्रा. प्रवीण कासार , प्रा. सागर पाचपुते, डॉ. सुदर्शन गिरमकर,श्री. सुभाष परकाळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या शिबिरामध्ये गावकऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले होते. कार्यक्रमास परिक्रमा संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सौ. प्रतिभाताई पाचपुते, परिक्रमा शैक्षणिक संकुलाचे मुख्य कार्यकारी अधिकारी ड.प्रतापसिंह पाचपुते, श्री.लक्ष्मण नलगे, सरपंच राजेंद्र रणपिसे, अनिल नलगे, प्रेमराज भोईटे, सुधीर नलगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.अनिल पुंड, डॉ. संजीव कदम पाटील, प्रा. मोहन धगाटे, प्रा.डॉ.सुनील निर्मळ, प्रा.डॉ.रमेश शिंदे, प्रा.डॉ.पांडुरंग इथापे, प्रा डॉ.प्रशांत सूर्यवंशी,प्रा. संदीप नागवडे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. अभिषेक पाचपुते, प्रा. विलास बांगर, प्रा. शेंडगे दीपक,उपस्थित होते.

# लोह्यात रमाई जन्मोत्सव उत्साहात साजरा

## शोभायात्रेने वेधले शहर वाशियांचे लक्ष

लोकनेता न्यूज नेटवर्क

लोहा । विशाल घंटे

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रत्येक जडण घडणीत मोलाची साथ देणारी माता रमाई यांच्या १२७ व्या जयंती निमित्त माता रमाई महिला मंडळाच्या पुढाकारातून रमाई यांच्या प्रतिमेची लोहा शहरातील मुख्य मार्गावरून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत मोठ्या संख्येने आंबेडकरी अनुयायांची उपस्थिती होती. सदरील मिरवणुकीने शहर वशियांचे लक्ष वेधले होते.

शहरातील रमाई महिला मंडळाच्या वतीने यंदा पहिल्यांदाच लोहा शहरात माता रमाई यांची भव्य जयंती उत्सव सोहळा दि. ७ रोजी सायंकाळी साजरा करण्यात आला. शहरातील डॉ. आंबेडकर नगरातील क्रांतीसुर्य बुद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने बुद्ध पूजापाठ घेण्यात आला. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब



आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. फुलांनी सजवलेल्या ट्रॅक्टर वरती माता रमाई यांची प्रतिमा ठेवून शहरातील मुख्य मार्गावरून रमाई प्रतीमेची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत रमाई गीते वाजविण्यात येत होती. मिरवणुकीत बहुसंख्येने महिला पुरुष शुभ्र वस्त्र परिधान करून सहभागी झाले होते. मिरवणूक विसर्जनानंतर अन्नदान वाटप करण्यात आले. तसेच रात्री शाहीर प्रेमकुमार मस्के आणि संच यांच्या रमाई गीतांचा कार्यक्रम पार पडला.यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी माजी अध्यक्ष ई. जे. बनसोडे, व्ही. के. कांबळे, वाय. बी. महाबळे, माजी नगराध्यक्षा त्रिशलाबाई कांबळे, नगरसेविका राहीबई खिल्लारे, नगरसेविका शारदाताई निर्मले, माजी नगरसेवक बबन निर्मले, बालाजी खिल्लारे, गंगाधर महाबळे, रिपाईचे तालुकाध्यक्ष सुरेश महाबळे, लक्ष्मण महाबळे, केंद्रीय शिक्षक धोंडीबा यानभुरे, तालुकाध्यक्ष बापूसाहेब कापुरे, केतन खिल्लारे आदींसह बहुसंख्य उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी माता रमाई महिला मंडळाच्या अध्यक्षा सुशिलाबाई महाबळे, राजश्री हटकर, सीमा कांबळे, मनीषा ढगे, सरिता महाबळे, रोहिणी जयमाला महाबळे, पुष्पा महाबळे, पूनम महाबळे, नंदाबई खाडे, रेखाबाई कांबळे आदींनी परिश्रम घेतले. उपस्थिती होती.

# कै.सुनील सुखदेव पाटील दळवी यांचे निधन

लोकनेता न्यूज नेटवर्क



कै. सुनील सुखदेव पाटील दळवी यांचे वयाच्या ४० व्या वर्षी अल्पशा आजाराने दिनांक ९.०२.२०२५ रोजी रात्री १०.३० वा. दुःखद निधन झाले त्यांच्या पश्चात आई ,वडील ,भाऊ , पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, असा मोठा परिवार आहे, त्यांच्या अंत्यविधीचा कार्यक्रम दिनांक १०.०२.२०२५ रोजी दानापूर येथे सकाळी ८.०० दरम्यान झाले...

# ९ वी भव्य बौद्ध धम्म परिषद महागाव शहरात आज पासून सुरुवात

लोकनेता न्यूज नेटवर्क

महागाव । विजय थोरात

डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय शिक्षण संस्था महागाव र.नं. एफ /११२४५ यवतमाळ द्वारा संचालित.. दिनांक ११व १२ फेब्रुवारी दोन दिवसीय स्थळ कृषी उत्पन्न बाजार समिती प्रांगण महागाव. तालुका.महागाव जिल्हा. यवतमाळ. मंगळवार ११ फेब्रुवारीला सकाळी ९ ते ११:३० वाजेपर्यंत पु. भंते धम्मदीक्षेत वाराणसी यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. धम्म परिषदेचे उद्घाटन पु.बनते मिलिंद वाघोली पुणे यांच्या हस्ते होणार आहे. भंते सोबत हिरो अन्य भिकू संघ यांची मंगल उपस्थिती राहणार असून ते धम्म देसना देणार आहेत. परिषदेत येणाऱ्या बौद्धउपकासाठी भिकू संघाकडून धम्म देसना व्याख्यानमाला आणि बुद्ध व भीम गीतांचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे कोल्हापूर येथील आठव्या इयतेत शिकत असलेली व आंतरराष्ट्रीय बाल प्रबोधनकार प्रिया नसते येणार आहे. मुंबईतील प्रसिद्ध गायक चंद्रकांत प्रल्हाद शिंदे अशोक निकाळजे अकोला येथील गायिका रणजीत गणेश जंजाळ कुणाल वैरागळे तसेच बुलढाणा येथील गायिका कल्पना खडे राय माधव वाढवे.आंध्र प्रदेश येथील बाल गायिका अंजली गडपायले गायक रंजीत शेजुळे यांची उपस्थिती राहणार आहे. अशी माहिती आयोजक सागर दादा पाईकराव यांनी दिली. या दोन दिवशी कार्यक्रमांचा बौद्ध उपासक व महागाव शहरातील परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आव्हान आयोजक व बौद्ध धम्म परिषद समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904